ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VII/Jan 2012pp.1-4

Research Paper

# स्त्रीवादी कथालेखन ः एक दृष्टिक्षेप

प्रा. रमेश शिंदे
मराठी विभाग.
कला व वाणिज्य महाविद्यालय.

*प्रस्तावना :—*

आज जगात सर्वच समाजमध्ये कुठल्या ना कुठल्या स्वरूपात स्त्री . पुरूष समानतेची चळवळ सुरू आहे . तथाकथित अप्रगत राष्टांमध्येसुद्धा त्या विषयाच लेखन व चर्चा सुरू झाली आहे . वृत्तपत्रे आणि प्रसारमाध्यमे स्त्रियांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देऊलागली आहेत . स्त्री चळवळीला योगदान देणारे . त्यांना विरोध करणारे आणि त्यांच्याकडे तटस्थपणे पाहणारे यापैकी कुणीच खरया अर्थाने स्त्री चळवळीपासून पूर्णपणे अलिपत राहू शकत नाहीत . एवढा स्त्री . पुरूषसमानतेच्या विचारांचा रेटा जाणवू लागला आहे . या नव्या परिस्थितीकडे केवळ भावनेच्या भाबडेपाणाने बधत राहण्याऐवजी डोळसपणे समजावून धेण्याचा प्रयतन केल्यास सर्व स्त्री . पुरूषस्वस्थचित्ताने नव्या सामाजिक बदलास सामोरे जाऊशकतील . व्यकतीगत पातळीवर स्त्री . पुरूषसमानतेकडे अटळपणे सुरू झालेला प्रवास दोधांसाठी ही आनंददायक ठरेल हे मात्र निश्चित .

'स्त्रियांच्या कथातम लेखनाचे स्वरूप' या व्यापक विषयाच्या मांडणीमध्ये विवेचनाच्या सुलभतेसाठी 'कथा' या वाडमयप्रकाराचे विश्लेषण करता येईल . षा मांडणीमध्ये स्त्रीवादी जाणिवेने लेखन करण्यारया लेखिकांच्या कथाचा परामर्श धेणार आहे . अर्थात सर्वच कथा लेखिकांच्या कथाचा परिपूर्ण आढावा नाही तर पुरूषवाचक म्हणून सामान्यत ः जितके वाचन या विषयाच्या उतसुकतेपोटी केले आहे तयातील काही प्रातिनिधिक लेखिकांच्या कथालेखनासंदर्भात काही निरीक्षणे संक्षेपाने नोंदविणार आहे .

## या विषयाच्या अनुषंगाने पुढील काही गृहीतके निश्चित करता येतील .

१ १९७५ पूर्वीच्या व त्यानंतरच्या कालखंडातील सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक पातळीवरील झालेल्या परिणाम स्त्रियांच्या लेखनावरती झालेला आहे

२ १९७५ नंतरच्या कालखंडात स्त्रीमुक्ती चळवळीच्या प्रभावातून स्त्रीवादी जाणिवेने मोठया प्रमाणात कथालेखन झाले

३ व्यक्तिगत दुःखातून समष्टीच्या दुःखाशी नाते जोडण्याचा प्रयत्न स्त्रीवदी जाणिवेच्या कथातून दिसते

४ पुरूषप्रधान संस्कृतीने आधुनिकीकरणाच्या स्पर्धेतही स्त्रीला वर्च स्वाखाली ठेवल्याची खंत या कथांमधून व्यक्त होते

दि सेंकड सेक्स प्रकाशित झाल्यानंतर स्त्री दास्याविषयीचे सिमॉन दि बोव्हा यांचे सिद्धांत स्त्री विषयक भान जागृत होण्यास खूप उपयुक्त ठरले मुलगा व मुलगी यांना वाढवण्यात केला जाणारा भेदभाव त्यंचे स्त्री व पुरूषया दोघांच्याही मानसिकतेवर होणारे दूरगामी परिणाम याचा सिमॉन ने आपल्या पुस्तकातून जीवशास्त्रीय मनोविश्लेषणात्मक व अधिभौतिकात्म दृष्टिकोनातून परामर्श घेतला व पुरूषप्रधान समाजव्यवस्थेला एक धक्काच दिला

परंतू याही अगोदर भारतीय स्त्रीवादी विचारसारणीचा पाया ताराबाई शिंदे यांनी

स्त्रीपुरूषतुलना या निबंधाच्या माध्यामातून घातला रामायण महाभारत यासारख्या महाकाव्यांपासून समकालीन मुक्तामाला मंजुघोष या कादंबया व मनोरमा नाटक आणि पूणेवैभव सारखी वृत्तपत्रे यातील दांभिकता उघड करून स्त्रियांच्या परवडीला पुरूषनिर्मित मूल्यव्यवस्था कशी जबाबदार आहे हे स्पष्ट केले आहे स्त्री पुरूष सामंजस्यातील शहाणपणा हीच विवेकवादी भूमिका असू शकते अशी भारतीय स्त्रीवादाची वैचारीक मांडणी त्यांनी केली स्वार्थासाठी पुरूषांना अनेक अनिष्ठ गोष्टी स्त्रियांच्या माथी धर्माच्या नावाखाली मारल्या या पुरूषीवृत्तीचा त्यांनी धिक्कार केला .

स्त्रियांनी लिहिलेल्या साहित्याने मूलतः स्त्रियांचे प्रश्न मांडावेत हे अगदी स्वाभाविक होय. स्त्री जन्माला येण्याने ज्या ज्या गोष्टी वाटयाला येतात त्यात पुरूषांच्या तुलनेने निर्बंधाचा अधिक जाच सहन करावा लागणे ही अगदी सार्वत्रिक अनुभवाची बाब होय. त्यातही पुन्हा लेखन स्वातंत्र सार्वत्रिक शिक्षण नसणे ही १९ व्या शतकात व विसाव्या शतकातच्या आंरभी सरसकट अनुभवाला येणारी गोष्ट होती त्यातूनही काही प्रयत्न झाले पण या स्त्रियांच्या वाटयाला त्या काळी निंदानालस्ती कुटाळकी व जाच सोसावा लागला असे त्यांची चरित्रे सांगतात ह्य रमाबाई रानडे सावित्रीबाई फुले काशीबाई कानिटकर इ. ह्र यामुळेच जनाबाईला भोवतालच्या स्त्रियांना स्त्री जन्म म्हणउनि न व्हावे उदास असा धीर द्यावा लागला होता साहजिकच आपल्यात पुरूषांहून कोणताच उणेपणा नाही याची जाणीव असणाया तत्कालीन स्त्रियांनी धाडसाने मोकळेपणाने आपले मानस शब्दांकित केलेले आढळते

प्रारंभकालीन कथालेखिकांच्या लेखनातून तत्कालीन सामाजिक वास्तवाचे अतिशय ढोबळ चित्रण आढळते स्त्रीमुक्तीच्या काही पाऊलखुणा अपवादाने त्यांच्या लेखनात आढळतात १९ व्या शतकातील या स्त्री कथालेखनात कहाणीचा घाट स्वीकारून नीती व धर्मविषयक संस्कार करणाया गोष्टी आढळतात उदा ः शांताबाई काशिताई कानिटकर १९२० नंतर स्त्री शिक्षणाच्या प्रसारामुळे व सामाजिक वातावरणात आलेल्या काही बदलांमुळे स्त्रियांच्या कथा लेखनाचे प्रमाण वाढले पण या कथांमधून बंडोखोरीपेक्षा समन्वयवादी भूमिकाच दिसून येते सामान्यतः स्त्री शिक्षण विधवांच्या समस्या पुनर्विवाहाचे प्रश्न बाला जरठविवाह या सामाजिक प्रश्नांशी संबंधित हे लेखन विषय होते

विभावरी शिरूकर यांच्या कळयांचे निःश्वास या कथासंग्रहातून पहिल्यानंदा स्त्री समस्येला वाचा फोडण्याचे कार्य केले प्रौढ कुमारिकांचे जीवनविषयक वास्तव आणि त्यांचा मानसिक कोडमारा यांचे मनोविश्लेषणात्मक दर्शन त्यांच्या कथेने घडविले त्या बरोबरच स्त्री पुरूषसंबंधाकडे बघण्याच्या पारंपरिक दृष्टिकोणाला छेद देणारी भूमिका त्यांनी घेतली १९४५ १९६० या काळामध्ये कुसूमावती देशपांडे वसुंधरा पटवर्धन शिरीष पै इत्यांदीनी विपुल कथालेखन केले परंतु या कथालेखिकांच्या कथामध्ये फारशी वेगळी वाट दिसत नाही वसुंधरा पटवर्धन यांनी विभावरीबाई प्रमाणे प्रौढ कुमारिकांची दुःखे हा कथा विषयक हाताळता शिरीष पै यांच्या कथालेखनात व्यक्तीगत जाणिवांना प्राधन्य दिले सामाजिक व्यवस्थेतून आलेल्या प्रश्नांमुळे निर्माण होणारी मानसिक वादळे असे विषय त्यांच्या कथामध्ये नाहीत

साठोत्तरी कालखंडातील स्त्रियांच्या कथा लेखनास एक नवी दिशा मिळाली जगभर स्त्रीमुक्ती आंदोलनाची चळवळ उभी राहिली आणि त्याचे लोण महाराष्ट्रतही परसले मराठीत निघाणाया स्त्रीविषयक नियतकालिकांतील विविध तात्विक चर्चा स्त्रीमुक्ती आंदोलनातील कार्यकर्त्या स्त्रियांचे वैचरीक व चळवळ विषयक लेखन या सर्वांची पार्श्वभूमी या कथांना प्राप्त झाली भोवतालच्या मानवी

Vol.1,Issue.VII/Jan 2012;

जीवनाचा आणि मानवी मनाचा सखोल वेध घेणाया लेखिकांचा एक नवा प्रवाह पुढे आला या लेखिकांनी मानवी जीवनातील सुख दुःखे व्यथा वेदना असहायता मानवी मनाच्या प्रकृती विकृती यासंबंधिच्या विविध अनुभवांचे चित्रण आपल्या लेखनातून केले अर्थात

या लेखनामागील परंपरा ही मध्यमवर्गीय आहे साहजिकच या साहित्यात येणाया वृत्ती प्रवृत्ती भावभावना श्रेयकल्पना जाणिव नेणिवेच्या पातळीवरील भावानुभूती या सर्व मध्यमवर्गीय जाणिवांमधून निर्माण झाल्या आहेत

सामाजिक आचार विचारांच्या चौकटीत बंदिस्त असणाया स्त्रीला चौकटीबाहेर पडण्याची प्रेरणा कथा वसुंधरा पटवर्धन कमल देसाई विजया राजाध्यक्ष गौरी देशपांडे उर्मिला
सिरूर सानिया अंबिका सरकार प्रिया तेंडुलकर आशा बगे अशी काही नावे घेता येतील अर्थात यात वाढही करता येईल स्त्रीजीवनाचा विविध दिशांनी शोध घेण्याचा प्रयत्न या लेखिकांनी कथेच्या माध्यमातून केला स्त्रीनिष्ठ अस्सल अनुभवातील व्यथावेदना व सूक्ष्मभावस्पंदने यांचा आलेख या लेखिकांच्या कथांमधून नेमकेपणाने पुढे आला

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीसंवाद मला अधिक महत्वाचा वाटतो अशी भूमीका घेऊन लेखन करणाया विजया राजाध्यक्ष स्त्री व तिचे वैविध्यपूर्ण अनुभव हे आपल्या कथेच्या केंद्रस्थानी ठेवतात. स्त्रीच्या अनुभवविश्वाचा त्यांनी आपल्या कथामधून संवेदनशील वृत्तीने वेध घेतला आहे . स्त्री देहात घडत जाणारे बदल स्त्रीचे शारीर अनुभव आणि स्त्रीच्या मानसिकतेत घडणारी परिवर्तन त्यांनी सूक्ष्मपणे कथांकित केली आहेत . उदा. कमळ विदेही यासारख्या कथा आपल्या लेखनाच्या आरंभकाळापासून लैंगिक अनुभवाच्या कथा विजया राजाध्यक्षांनी अतिशय धीटपणे लिहिलेल्या आहेत .

भारतीय मूल्यव्यवस्थेचे भान स्त्रीवाद अंगाने लेखन करणाया लेखिका म्हणजे आशा बगे होय . आधुनिक स्त्रीवाद विचार आणि पारंपारिक भारतीय कुटूंबातील मूल्यव्यवस्था यांचा सुवर्णमध्य आशा बगे यांच्या एकूण लेखनातून दिसतो. धीटपणे येईल त्या प्रसंगाला सामोरे जायचे कांगावा करायचा नाही रडारड करायची नाही आणि स्वतःच्या मनाविरूद्ध तडजोड करायची नाही ही जीवनरीत त्यांच्या कथांतर्गत स्त्रीचित्रणातून व्यक्त होते. सौम्यपणे अनुभवांचे पदर उलगडत उलगडत समर्थ व स्वाभिमानी स्त्री उभी करण्याचे कौशल्य आशा बगे यांच्या कथांनी व्यक्त केले आहे. दर्पण हिवाळा येरझारा अशा त्यांच्या कथांनी एकीकडे भावकोमल तर दुसरीकडे कणखर भावाविष्काराचा प्रत्यय आणून स्वतः आतून बदलणारे स्वावलंबी असण्यात आनंद मानणारे आत्मविश्वासपूर्वक जगणारे आत्मसामार्थ्यचा साक्षात्कार झालेले स्त्रीमन त्यांच्या कथांमधून अनुभवता येते त्यांच्या कथेतील नायिका या मर्यादाशील असतात. पण विचारांनी मात्र मुक्ती असतात .

मराठीमध्ये गौरी देशपांडे. प्रिया तेडुलकर पद्मजा फाटक मेघना पेठे यांना जहाल स्त्रीवादी भूमिकांशी सुसंगत अशी आशयसूत्रे घेऊन कथा लिहिल्या आहेत. गौरी देशपांडे यांना आपल्या साहित्यात पुरूषपात्रांना जाणीपूर्वक गौणत्व दिलेले दिसते. किंबहुना पुरूषपात्रांना प्रसंगी नामे न देता केवळ सर्वनामाचा वापर करून त्यांच्या अस्तित्वा दुय्यमत्व आपल्या कथांमध्ये रेखाटले आहे. स्त्रीला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे आणि ती तो भक्कमपणे ताठपणे व योग्य प्रकारे बजावू शकते. हे त्यांना कथांच्या माध्यमातून दाखवून दिले. मध्यमवर्गीय पारंपारिक संकेत धुडावून स्वतंत्रपणे विचार करायला प्रवृत्त होणाया स्त्रिया गौरी देशपांडे यांच्या नायिका आहेत उत्कटपणे व्यक्तिप्रधान जगण्याची प्रबळ उर्मी असणाया स्त्रियांना त्यांनी मूर्त केले विवहसंस्था कुटुंबसंस्था यांचा त्यांनी प्रतिवाद करून लिव्हिंग टुगेदिर अशा मैत्रीपूर्ण सहजीवनाचा नवा पर्याय आपल्या वाडमयातून पुढे आणला गौरी देशपांडे यांच्या मते आर्थिकच नव्हे तर कुठलीही गरज ही नात्यामध्ये असू नये लग्नसंस्थेमुळे जे परस्परावलंवन निर्माण होते ते याच कारणामुळे नवयाची बायको बापाची मुलगी मुलांची माता यापेक्षा एक स्त्री म्हणून स्वतःचे अस्तित्व आहे ते टिकवण्यावर विकसित करण्यावर गौरी देशपांडे भर देतात शरीर मातृत्वाऐवजी अशारीर मातृत्वाचा पुरस्कार करून पुरूषाच्या लैंगिक वर्चस्वाचा प्रतिवाद करणारे कथानक निर्माण करून भाषिक स्वरूपात राजकीय कृतीच केली आहे उदा ः कलिगंड ही कथा गौरी देशपांडे यांनी परंपरा अस्तित्वाला येऊ पाहणारा जडशीपणा याविरूद्धचा संघर्ष उपहासात्मरित्या व्यक्त केला त्यांच्या नायिकांना स्वतःचे एक वैशिष्टये आहे ही स्त्री कधीही सुंदर वगैरे नसते बहुधा सावळा रंग मध्यम उंची हडकुळी चष्पा लावणारी असते म्हणजे सौंदर्य नाजूकपणा कमनीय बांधा वगैरे यासारखी चौकट या स्त्रियांना नसते गौरी देशपांडे यांच्या लिखाणात वरकरणी उपरोध उपहास आत्मनिंदा मिस्किलपणा व फटकळपणा असला तरी त्यांच्या कथेत वेदनांची खोल वाहती जखम असते उदाः नाही तर मरा आहे हे असे आहे या कथा ही वाहती जखम दाखविण्यापेक्षा तिची ठणकती कळ जेव्हा त्यांच्या कथेतून व्यक्त होते तेव्हा त्याच्या लिखाणची खोली आणि अंतर्मुखता प्रभावीपणे जाणवते

दुःख आणि वेदना या मुलतः शोषाणातून उत्पन्न होतात हे शोषण शारीरिक मानसिक आर्थिक सामाजिक सर्व प्रकारचे असते या शोषणाची चित्रे स्त्रिंयाच्या कथांनी रेखाटली आहेत स्त्रिंयाच्या शोषणाचं आणि त्यावर मत करणाया नायिकेच्या मानसिकतेंच प्रभावी चित्र प्रिया तेंडूलकर यांच्या फर्टिलिती क्लिनिक या कथेत आढळतप जयप्रकाश पाटील या संस्थानिक पुत्राबरोबर लग्न झालेल्या डॉ . तनुजाला नऊ वर्षे झाली तरी मुल होत नाही म्हणून अमेरिकेतील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी ठेवतात वंशाला दिवा हवा या हट्टापोटी या गोष्टीचा तिला ताण येतो आणि एके दिवशी तिच्या मनात विचार येतो बायको म्हणजे वंशाचे दिवे पेटवणारी आगपेटी वाटली काय रे तुला जयप्रकाश पाटला नाही राहायचे मला असे पेशंट नंबर चारशे बत्तीस बनून या परक्या देशात प्रिया तेंडूलकरांच्या कथांमध्ये नायिका अशा वारंवार बंड करून उठतात पारंपरिक जीवन संकेताविरूद्ध पुरूषी अहंकाराविरूद्ध चाकोरीबद्ध जगणं त्या नाकारतात नोकरी करणाया स्त्रियांचे अनुभवविश्व तेंडूलकर यांच्या कथेत मोठया प्रमाणात दिसते एअर होस्टेज या कथेत येणारी स्त्री या व्यवसायाकडे पुरूषसत्ताक संस्कृतीचा बघण्याचा दृष्टिकोण अधोरेखित करते या हवाई सुंदरीशी लग्न करणारा उद्योगपती नवरा मात्र लग्नानंतर ही नोकरी करण्यास तिला नकार दर्श वितो व तिला राजीनामा द्यावयास लावतो आणि रात्री तिचे शरीर ओरबाडून सकाळी घडलेल्या प्रसंगाबददल साळसूदपणे सॉरी फॉर द लास्ट नाईट म्हणून झाल्या गेल्याची जबाबदारी झटकून मोकळा होतो

स्त्रीलाही स्वतःकडून काही अपेक्षा असतात आणि इतरांकडून काही पण त्याबाबत विचार करण्याची समाजाला कुटुंबाला अगदी जवळच्या माणसांनाही गरज वाटत नाही हाच विचार प्रिया यांच्या तुकडे या कथेत येतो त्यांच्या अनेक कथांमधून सांकेतिक वैवहिक जीवनाच्या प्रस्थापित नात्यांचा आणि जीवनविषयक मुलभूत प्रश्नांचा शोध भावनिक व वैचारीक प्रगल्भतेने घेतलेला दिसतो. त्यांच्या कथा प्रचारकी नाहीत त्या मध्यम उच्चमध्यमवर्गीय स्त्रीचे दुःख शोषित जातात हा त्यांच्य कथांचा केंद्र बिंदू आहे या स्त्रिंयाच्या आयुष्यातली मैत्री प्रम लग्न लग्नानंतरही स्वत्व जोपासण्याची तीव्र इच्छा पुरूषांचा आंधळा अंहकार त्याविरूद्धचा लढा असुरशिततेची भावना घटस्फोट या विषयींचे भाष्य प्रिया तेंडूलकर यांच्या कथांमधून करतात या प्रत्येक टप्प्यावरच्या प्रश्नांशी त्यांच्या नायिका झगडताना दिसतात

अगदी अलीकडच्या काळात साहित्यातील सर्वस्वी विलक्षण स्त्रीरूपे मेघना पेठे यांच्या साहित्यनिर्मितीतून साकार होतात पुरूषांचे विश्व पुरूषांचे अनुभव पुरूषांचे भाषा याहून स्त्रीचे विश्व अनुभव भाषा सर्वस्वी वेगळी असते अशी जी आजवरची समजूत होती ती त्यांनी पुसून टाकली म्हणजे पुरूषापेक्षा स्त्रीचे वेगळीपण केवळ शारीर भेदात नाही तर व्यक्ती म्हणून एकजण दुसरीपेक्षा भिन्न असते केवळ स्त्री म्हणून नाही हे त्याच्या कथांनी स्पष्ट केले आंधळयाच्या गायी हंस अकेला या त्यांच्या कथासंग्रहातील स्त्रिया स्वतःचा स्वतंत्र विचार करताना दिसतात स्त्री पुरूष संबंधातील बदलत्या जाणिवांचाही आविष्कार मेघना पेठे त्यांच्या कथेतून घडवतात साहित्याच्या ठरीव दंडकांना ओलाडून ठराविक नैतिक व प्रस्थापित सामाजिक सांस्कृतिक मूल्यव्यवस्था नाकारून मांगल्य आणि सौंदर्य यांची बेगडी रूपे नाकारणारी एक वेगळी नवता मेघना पेठे त्यांच्या कथेत सतत आढळते स्त्री विशिष्ट अनुभव मांडण्याची ताकद त्यांच्याकडे आहे स्त्रीचे स्वातंज्य दाखविताना त्यांच्याकडून स्वैराचारी स्त्रीचे चित्रण घडते त्यांच्या स्त्रीप्रतिमा लैंगिक जाणिवांचा सर्वकष शोध घेणाया आहेत होणारे परिणाम अटळ

मानून या स्त्रीया स्वतःचे निर्णय स्वतः घेताना दिसतात

आधुनिक काळातील महत्वाकांक्षी स्त्रियांना मातृत्व ही गोष्ट व्यक्तीमत्त्वविकासाच्या वाटेला अडसर आहे असे वाटते सानिया यांनी रिच्युअल या कथेत अशाच लग्नसंस्थेमुळे अपरिहार्यपणे वाटयाला आलेल्या सक्तीच्या मातृत्वाचे अनुभव रेखाटले आहेत या कथेची नायिका सुमित्रा हिला आपल्याला झालेल्या आपत्याची किळस येते मनात विलक्षण नावड ठेवून मुलांना जन्म देण्यात काय स्वारस्य असा तिचा प्रश्न आहे मध्यमवर्गात जन्मलेल्या उच्च मध्यमवर्गात वावरणाया उद्योगप्रधान जीवनप्रणालीतून येणाया जबाबदाया पेलणाया अशा नायिका सानियाने उभ्या केल्या आहेत वीस वर्षाहून अधिक काळ कथा लेखन करणाया सानिया यांची गेल्या दशकातील कथा अत्यंत सौम्यपणे संयत व अभिजात शैलीने मांडल्या आहेत स्त्रीच्या ठिकाणीदेखील असणाया प्रगल्भतेच्या उपजत शहाणपणाचा अनुभव देणाया कथा त्यांनी लिहिल्या स्त्री पुरूषातील संबंधावर विसंवादाची छाया पसरू लागली की नाती आपोआप संपू लागतात अशा आशयाच्या या कथा आहेत्

१९६० नंतरच्या लेखनात आपली स्वतःची ओळख कथा लेखनाने निर्माण करण्यात कमल देसाई यांना यश लाभले आहे त्यांच्या कथात्म साहित्यातून प्रकटणारी स्त्री बुद्वीमान मनस्वी आणि पांरपारिक विचार पद्वाती झुगारून देणारी आहे कमल देसाईचे लेखन हे मूलतः लिंगभाव निरपेक्ष स्वरूपाचे आहे त्यांच्या नायिकांना प्रेमात पडण्यात किंवा पुरूषांचा तिरस्कार करण्यात तिळमात्र रस नाही अर्थाजन करणाया प्रौढ कुमारिकांचे अनुभवविश्व हा विषय कमल देसाईनी मोठया ताकदीने हाताळला आहे त्यांच्या रंग कथेतील नायिका सुमित्रा ही नोकरी करणारी प्रौढ कुमारिका आहे वयाची पस्तिशी उलटून गेली तरी भावाबहिणींचे संसार उभे करण्यासाठी तिने स्वतःच्या संसाराची चूल मांडलेली नाही आता कोणती नवीन जबाबदारी घेण्याची तिला भय वाटते सतत मागणी घालणाया केशवाला आयुष्यातील सर्व रंग संपल्याचे सांगून नाकारते खया चा शोध घेणे हे त्यांच्या कथालेखनातील एक प्रमुख सूत्र आहे .मानवी स्वभावातील व्यामिश्रतेचे अनेक धागे उकलण्याचा त्याचा प्रयत्न असतो . त्यांच्या कथेतील पात्रांच्या वाटयाला अपरिहार्यपणे येते ते दुःख वैफल्य कुरूपता आजार विकृत्य अपेक्षाभंग ही माणसे सतत अनुभवतात व्यक्तीकेंद्री अनुभव कमल देसाई व्यक्त करतात्

स्त्रीया स्वतःला जाळून घेऊन आत्महत्या करतात परंतू त्यांनी जी किंमत मोजलेली असते त्याचा काहीच परिणाम समाजाच्या मानसिकतेवर होत नाही. अंविका सरकार यांना या निर्ढावलेल्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकणारी चुलीतील लाकडं ही कथा लिहीली आहे. स्त्री पूरूष यांच्यातील पारंपरिक संकेतावर अंविका सरकार यांची कथा भाष्य करते्

लौकिक जीवनातील समस्याच्या कथानुभवाला वाङःमयीन आकृतीबंध प्राप्त करून देण्यासाठी लोककथातील बीजाशयाचा कलात्मक उपयोग करून घेणे हे प्रतिमा इंगोले यांच्या कथांचे महत्त्वाचे वैशिष्टये आहे त्यांच्या सोननिळ पाखरू या कथेत मनोविश्लेषणात्मक पातळीवरील अनुभवाचा हा गुंता लोककथेच्या रूपकात्मक अंगाने मांडला आहे लोककथेच्या पाखराच्या डोक्यातला काटयाचा डंख आणि त्याच्या नजरेतील आर्तता सुनवाईच्या दुःखानुभवाचा डाग आणि मुलासाठी तिची तुटणारी नजर यांच्याशी संवादी होऊन ही कथा अनुभवाला काव्यात्मतेचे परिमाण प्राप्त करून देते ग्रामीण स्त्रीच्या जीवनातील ताणतणाव प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कथेतून टिपले आहेत वहाडी बोली अपरिचित असणायानाही त्यातील प्रतिमांनी थक्क करून टाकावं असं सामर्थ्य त्यांच्या कथेत या कथा वहाडी खेडूत स्त्रियांच्या आहेत पण खरं म्हणजे स्त्री दुःखाला जात नाही प्रदेश नाही देश नाही ते तिच्या जन्मावरोवर थोडयाफार फरकाने सगळीकडे येतेच्

उर्मिला पवार हिरा बनसोडे व अलिकडच्या काळात सजगतेने कथा करणाया प्रज्ञा लोखंडे या लेखिकांनी मराठी कथेत दलित स्त्रीचित्रण आणले . एक ती दलित आहे तर दुसरे स्त्री आहे .या दुहेरी शोषणाच्या व्यवस्थेचे स्त्रीजीवनावरती झालेले दूरगामी परिणाम तिची मानसिकता व कोंडमारा आपल्या कथांमधून माडंला आहे्

खरे तर स्त्रीवादी अनुषंगाने उर्मिला सिरूर सरिता पदकी छाया दातार पद्मजा फाटक पदमिनी बिनीवाले वसुधा पाटील माधवी देसाई अशा कथालेखिकांच्या उल्लेख करावा लागेल पण संयोजकांच्या शब्दमर्यादेमुळे त्यांचा याठिकाणी फक्त नामनिर्देश करतो व याविषयाच्या अनुषंगाने शेवटी काही ठळक निरिक्षणे नोंदविता येतील्

१. विभावरी शिरूरकर यांच्या आधीच्या स्त्री कथा शिक्षण विधवांच्या समस्या पुनर्विवाहाचे प्रश्न बाल विवाह जठर कुमारी विवाह या सामाजिक प्रश्नांची गुंतागुंत होती विभावरी शिरूरकरांनी मनोविश्लेषणाच्या रूपात मांडले्

२. नंतर काळातील महत्वाचा बदल म्हणजे प्रेमकथा संपली तो आणि ती त्यांची आणाभाका घेणारी भावविवश भाषा त्यांचा चुंबने अलिंगने व जीवनसाफल्यात होणारी या सर्वाची फलश्रुती हे चित्र पुसले गेले .

३. स्त्रीवादी चळवळीने जाग्या केलेल्या आत्मभानाची आत्मसन्मानाच्या जाणिवेची परंपरेने होत राहिलेल्या शोषणाची स्त्रीला सरसकट गृहीत धरण्याच्या विचारप्रक्रियेची नोंद कळतनकळत स्त्रियांच्या कथेत होत राहिली्

नंतरच्या स्त्री साहित्यात पारंपरिक नीतिमूल्यांना आणि सांस्कृतिक स्त्रीत्वाला धक्के देणारे अनेक शारीरिक मानसिक अनुभव स्त्रियांनी थेटपणे व्यक्त केले कुटुंब मित्रपरिवार नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने पारचित झालेल्या व्यक्ती त्यातील ताणतणाव आधुनिक समाजातील व्यक्तीना जाणावणारे प्रश्न यांचे उत्कट दर्शन या कथांनी घडविले .

५ भगिनीभाव जागविणे समलिंगी सहजीवनाचा पुरस्कार करणे मुक्त मैत्रीचे समर्थन करणे विस्तारित कुटुंबाचा नवा पर्याय पुढे आणणे इ. आशयसूत्रे घेवून संघषशील स्त्री स्वातंत्र्यवादी स्त्रीची प्रतिमा निर्माण करणे व नवी स्त्रीवादी वाडमयीन संस्कृती घडविणे हे या काळातील स्त्री साहित्याचे स्वरूप होते्

६ नव्या मराठी कथा साहित्यात आशा वगे या पारंपारिक आणि आधुनिक जीवनपद्धतीतल्या समतोलनाचा शोध घेतात तर सानिया संवेदनशील मानने हे आधुनिक जगणे शोधत राहते गौरी देशपाडे अत्यंत थेटपणे स्त्री पुरूषसंबंध लिहीत जातात तर समजुतीच्या मार्गाने जीवनात समतोल आणता यं ऊशकेल हयावर अरूणा ढेरे विश्वास करत राहतात

७ मध्यमवर्गीय उच्चमध्यमवर्गीय अनुभव विश्वासाच्या कक्षा ओलांडून हे कथा लेखन फारसे गेलेले दिसत नाही प्रतिमा इंगोले यांचा अपवाद वगळल्यास ग्रामीण स्त्रियांचे अनुभवविश्व क्वचितच लेखिकांनी कथाविषय बनवलेले दिसते उर्मिला पवार हिरा बनसोडे व प्रज्ञा लोखंडे अशा काही मोजक्याच लेखिकांनी दलित स्त्रियांचे चित्रण आपल्या कथांमधून मांडले

८ स्त्रीचा आर्थिक दर्जा हा तिच्या विकासातील महत्वचा घटक असला तरी सुद्धा तिचा दर्जा सुधारण्यासाठी केवळ तिची आर्थिक परिस्थिती सुधारणे पुरेसे नाही तर जोपर्यत आर्थिक स्वावलंवनावरोवर आवश्यक ते नीतिमूल्यात्मक सामाजिक सांस्कृतिक बददल अस्तित्वात येत नाहीत : तोपर्यत नवी स्त्रीनिर्माण होणे शक्य नाही ही अशी अनेक लेखिकांच्या लेखनात व्यक्त होते्

## संदर्भ :

१ खोले विलास संपा ःताराबाई शिंदे लिखित स्त्रीपुरूषतुलना प्रतिमा प्रकाशन पुणे प्र आ १९९७
२ जाधव रा ग : निवडक समीक्षा पद्यगंधा प्रकाशन पुणे प्र आ २००६
३ वरखेडे मंगला : स्त्रियांचे कथालेखन साकेत प्रकाशन दु आ २००५
४ दुभाषी अरूणा : समीक्षेतील नव्या संकल्पना मनोहर जाधव स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र आ २००१
५ गोखले करूणा अनुवादः सेंकड सेक्स सिमोना द वोव्हा पदमगंधा प्र २०१०